# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

पहिला मजला, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, खेरवाडी,
अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०० ०५१ फोन नं - २६४७ ४८९२/१६१९
ईमेल – jtdirrom@gmail.com Web site : http://jdteromumbai.com

क्र.३/विकामुं/तंशि/लेखा-२/२०१२/ 3795
दिनांक : 26 NOV 2012

प्रति,
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
मुंबई / ठाणे / पेण/ रत्नागिरी / मालवण / विक्रमगड
शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई / शासकीय औषधनिर्माणशास्त्र, रत्नागिरी

विषय :- कंत्राटी पध्दतीवर चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबत.
पहारेकरी /सफाईगार/माळी

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये पहारेकरी/सफाईगार व माळी या मजूर पदापैकी रिक्त असलेल्या पदावर कंत्राटी स्वरूपात नियुक्ती करावी असे शासनाचे धोरण आहे. अखिल भारतीय तंत्रपरिषदेच्या मानकानुसार वर्ग -४ संवर्गातील पहारेकरी/हमाल/सफाईगार व माळी ही पदे शासनाच्या धोरणानुसार निव्वळ कंत्राटी स्वरूपावर भरण्याचे आदेश शासनाने निर्गमित केलेले आहे. त्यानुसार सदर रिक्त पदावरती नेमणूक करतांना शासनाने ठरवून दिलेल्या ठेकेदाराकडून निवीदा मागवून नेमणूक करावी. अशी सूचित केले आहे. त्यानुसार वर्ग-४ संवर्गातील पदे भरतांना त्यांना देय ठरणारी रक्कम वेतन या उददीष्टातून खर्च करण्यात यावी. असे कार्यालयाची धारणा आहे. परंतू काही संस्थेकडून सदरचा खर्च कंत्राटी सेवा -१० या उदिदष्टाखाली खर्च दाखविण्यात आलेला आहे. तसेच सदर पदावर नेमणूक करतांना शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दती अवलंबलेल्या आहेत का याचे खातरजमा करण्यात यावी.

आपणांस या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, विशेषता सफाईगार/माळी व हमाल या पदावर नेमणूक करतांना विहित कार्यपध्दती अवलंबी जात नाही, असे या कार्यालयाच्या निर्दशनास आलेले आहे. तसेच तात्पूरत्या स्वरूपात नेमणूक करताना देखील या कार्यालयाची पूर्व परवानगी किंवा मान्यता घेतल्याची मान्यता घेतली जात नाही असे आढळून आली आहे. या पदावर या कार्यालया मार्फत विहित पध्दतीने भरती केली असती तर त्या कर्मचा-यांचे वेतन या उददीष्टाखाली खर्ची घातले गेले असते. त्यांमुळे सफाईगार/माळी व हमाल यांची देखील नियुक्ती कंत्राटी स्वरूपात केली असली तरी सदरचा खर्च वेतन -०१ या उदिदष्टाखाली खर्च करण्यात यावी. अशी या कार्यालयाची धारणा आहे. या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, सदर पदावर कोणत्याही पध्दतीने नियुक्ती केली असल्यास त्यांच्या सेवा संपुष्टात आणून सूधारीत मार्गाने नियुक्ती करण्यात यावी अशी कार्यालय प्रमुखांनी दक्षता घेण्यात यावी.

( जी. बी. धनोकार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत:- १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांना माहितीकरीता
२. संकेत स्थळावर ठेवावी